# मालवणी पोलीस ठाणे, परिमंडळ ११

## प्रेस नोट

दिनांक :— १६/०७/२०२२

### खुनाच्या गुन्हयातील विधीसंघर्षग्रस्त बालक मालवणी पोलीसांनी घेतले ताब्यात

दि. १६/०७/२०२२ रोजी दुपारी अंदाजे १२.३० वा. चे दरम्यान इसम नामे तौसिफ खान हा अंबोजवाडीमध्ये त्याचे घराकडुन बाथरूमकडे जात असताना त्याचवेळी मोनिया मस्जिदकडुन सदर परिसरातील विधीसंघर्षग्रस्त बालक हा देखिल बाथरूमकडे आला असताना ते एकमेकांना रागाने पाहून आपआपसात वाद घालु लागले होते. नमुद वेळी विधीसंघर्षग्रस्त बालक याने चाकुने तौसिफच्या डाव्या बगले खाली बरगडी खाली भोसकले त्यामुळे तौफिक गंभीर जखमी झाल्याने उपस्थित लोकांनी तौफिक यांस पुढील उपचारकामी शताब्दी रूग्णालय,कांदिवली वेस्ट, मुंबई येथे उपचारकामी रूग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी दाखलपुर्व मयत घोषित केले. नमुद जखमी इसम तौफिक यांस चाकुने भोसकुन त्याचे मृत्यूस कारणीभुत झाल्याने विधीसंघर्षग्रस्त बालक याचेविरूध्द मालवणी पोलीस ठाणेस गुरक्र.९६०/२२ कलम ३०२,५०४,५०६ भादवी सह ३७ (अ) १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद घटनेच्या घटनास्थळावर पोलीस तात्काळ पोहचले व चाकुने भोसकणाऱ्या इसम विधीसंघ ग्रिस्त बालकास यास तात्काळ ताब्यात घेण्यात आले.

गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने विधीसंघर्षग्रस्त बालक यांस पोलीसांनी ताब्यात घेवून पोलीस ठाणेस आणुन चौकशी केली असता आज दोघांत वाद झाल्याने रागाचे भरात तौफिक यास चाकुने भोसकुन खुन केल्याचे कबुली दिल्याने व प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने जबाब दिल्याने त्यास नमुद गुन्हयात ताब्यात घेण्यात आले. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोनि जाधव हे करीत आहेत.

Scanned with CamScanner

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्
दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.१५९ / वार्ता.कक्ष /२०२२ दिनांक : १६ / ०७/ २०२२

# -: प्रेसनोट :-

## मालवणी पोलीस ठाणे - खून

दि. १५/०७/२०२२ रोजी २३:०० वा. चे सुमारास यातील अटक आरोपी याने त्याची पत्नी नामे विजयमाला ज्ञानोबा बलाडे, वय ४८ वर्ष, रा. ठि. रुम नं. ६६, यशोदप को. ऑप. हौ. सोसायटी, (अंदा कॉलनी) गेट नं. ०८, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई ही अटक आरोपी यास जवळ झोपु देत नव्हत्या या कारणावरून त्या दोघांच्यात वाद झाल्याने अटक आरोपीताने घरातील दगडाचा पाटा उचलुन विजयमाला हिच्या डोक्यात घालुन तिचा खून केला म्हणुन गु.र.क्र. ९५८/२०२२, कलम ३०२ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.